प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

जानेवारी 25, 2019

**बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 (एएसीएस) च्या कलम 35 अ खालील निर्देश - दि आर.एस. को-ऑपरेटिव बँक लि., मुंबई, महाराष्ट्र**

निर्देश दि. जून 24, 2015 अन्वये, दि आर.एस. को-ऑपरेटिव बँक लि., मुंबई, महाराष्ट्र ह्यांना, जून 26, 2015 रोजीचे व्यवहार बंद झाल्यापासून निर्देशांखाली ठेवण्यात आले होते. ह्या निर्देशांची वैधता वाढविण्यात आली होती व शेवटून देण्यात आलेले दि. जुलै 2, 2018 चे निर्देश, पुनरावलोकनाच्या अटीवर जानेवारी 25, 2019 पर्यंत वैध होते.

जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित केले जात आहे की, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित, कलम 35अ च्या पोटकलम (1) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँक येथे निर्देश देते की, निर्देश दि. जुलै 2, 2018 अन्वये, शेवटून जानेवारी 25, 2019 पर्यंत वैधता वाढविलेले, दि आर.एस. को-ऑपरेटिव बँक लि., मुंबई, महाराष्ट्र ह्यांना, दि. जून 25, 2015 रोजी दिलेले व वेळोवेळी मुदतवाढ दिलेले निर्देश, आणखी **चार** महिन्यांसाठी, म्हणजे **जानेवारी 26, 2019 ते मे 25, 2019** पर्यंत, पुनरावलोकनाच्या अटीवर, निर्देश दि. जानेवारी 16, 2019 अन्वये, वरील बँकेला लागु असणे सुरुच राहील.

वरील बदल अधिसूचित केलेली, निर्देश दि. जानेवारी 16, 2019 ची एक प्रत, जनतेच्या माहितीसाठी वरील बँकेच्या कार्यालयात लावण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व बँकेने केलेल्या वरील बदलांचा अर्थ, वरील बँकेच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असल्याबाबत भारतीय रिझर्व बँकेचे समाधान झाले आहे असा घेण्यात येऊ नये.

**शैलजा सिंग**

उप महाव्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2018-2019/1744**